‘A’ Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon


## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २१ ऑगस्ट: : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या क्रीडा विभागातर्फे दोन दिवसीय शारीरिक शिक्षण संचालक क्रीडा शिबिराचे आयोजन विद्यापीठाच्या डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम भवनातील सभागृहात करण्यात आले. प्र - कुलगुरु प्रा. एस. टी. इंगळे यांचे हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य नितीन झाल्टे, ॲड. अमोल पाटील, प्रा. पवित्रा पाटील, अधिसभा सदस्या स्वप्नाली काळे, क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील, डॉ. तारक दास, डॉ. श्रीकृष्ण बेलोरकर, डॉ. हर्षदा पाटील, विद्यापीठ क्रीडा मंडळाचे सदस्य डॉ. राहुल ठाकूर उपस्थित होते.

शहादा येथील प्रसिद्ध फिजिओथेरपिस्ट डॉ. स्वप्नील सोनार यांनी ‘स्पोर्ट्स इंज्युरी’ या विषयावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा क्षेत्राबद्दलची आवड वाढविण्यासोबतच खेळताना होणाऱ्या दुखापतींबाबत योग्य काळजी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. खेळाच्या मैदानावर उतरण्यापूर्वी योग्य पूर्वतयारी करावी आणि दुखापत झाल्यास शास्त्रीय व चिकित्सक पद्धतीने उपचार करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. खेळाच्या सरावादरम्यान होणाऱ्या स्नायूंच्या दुखापती, मुरगळणे, सांध्यांना होणाऱ्या इजा, फ्रॅक्चर, लिगामेंट दुखापत तसेच स्नायूंवर येणारा ताण याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.

यावेळी मार्गदर्शन करतांना प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे म्हणाले की, खेळाडूंनी योग्य मार्गदर्शन घेवून नियमित सराव करून घ्यावा. सराव करत स्पर्धेत यश संपादीत करावे असे सांगितले. यावेळी व्य.प. सदस्य ॲड. अमोल पाटील यांनी देखील मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात डॉ. मेघा चोपडे यांनी ‘क्रीडा मानसशास्त्र’ या विषयावर मार्गदर्शन केले. खेळाडूंनी शारीरिक आरोग्यासोबत मानसिक आरोग्याचीही काळजी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. नियमित खेळामुळे शारीरिक तसेच मानसिक आरोग्य चांगले राहण्यास मदत होते, असे त्यांनी स्पष्ट केले. स्पर्धेपूर्वीचा ताण कमी करणे, पराभवातून सकारात्मक शिकणे, लक्ष्य निश्चित करणे, एकाग्रता वाढविणे आणि संघभावना विकसित करणे या बाबींवर त्यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील यांनी केले. या दोन दिवसीय शिबिरास जळगाव, धुळे, नंदुरबार तसेच एरंडोल विभागातील कार्यरत शारीरिक शिक्षण संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिराचे सूत्रसंचालन सुभाष पवार यांनी केले.

................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २१ ऑगस्ट, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,जळगाव

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता